## नाट्य परीक्षण - ‘Don’t worry be happy‘




(चित्र जालावरून साभार)

आत्ताच काही वेळापूर्वी अण्णाभाऊ साठे सभागृहात ’Don’t worry be happy’ चा प्रयोग पहिला. स्वानंदी, उमेश आणि आशुतोष तिघांची अप्रतिम कामे. स्पृहाचा प्रयोगही पाहिला होता. स्वानंदीने तिचा ठसा उमटवला. कुठेही स्पृहाची copy वाटली नाही. दोघीही जणी इतक्या गुणी कलाकार आहेत की दोघीचे काम फारच ओरिजिनल आहे.

गमंत म्हणजे स्पृहा, उमेश, आशुतोष ह्यांच्या आयुष्यातील कथानक आणि तेच स्वानंदी, उमेश, आशुतोष ह्यांच्या आयुष्यातील कथानक ते कसे पेलू शकतात हे त्यांनी नैसर्गिक अभिनय शैलीतून सादर केले. टेरेस वरल्या शेवटच्या प्रसंगात स्वानंदी आणि उमेश ह्यांनी दिलेले expressions थोडा वेळ अजून  रेंगाळत ठेवले असते किंवा त्यांना काही वेळ नि:शब्द ठेवले असते तर ह्या प्रसंगाचा प्रभाव अधिक झाला असता. कॅन्सर सारख्या आजाराचा आधार न घेताही त्यांच्यातले patch up दाखवले असते तर अधिक आवडले असते. दरवेळी आजाराच्या निमित्तानेच जोडपी जवळ येतात आणि परिस्थिती accept करतात आणि मग सगळं विसरून एकत्र येतात आणि महान बनतात हे न दाखवता बालिशपणा, ego ह्यावर मात करू शकतात हे दाखविता आले असते का? असा लेखकाला प्रश्न? तरीही अर्थातच, लेखकाचे विशेष कौतुक ! आत्ताच्या पिढीतील महत्वाचे challenges त्यांना कुठल्याही प्रकारची स्ट्रेस कशी create करू शकतात आणि मग ह्या पिढीकडून अवलंबिले जाणारे पर्याय कसे असू शकतात हे अप्रतिम पद्धतीने सादर केले आहे. कुठेही थिल्लरपणा, उथळ dialogue, अभिनय नाही. स्वतःला अतिशय ओपन minded आणि मोकळेपणाने कुठल्याही विषयवार बोलता येते असे समजणारी ही सध्याची पिढी आयुष्यातील महत्वाच्या विषयावर आपसात विश्वासाने बोलुही शकत नाहीत. त्यांना नेहमी मित्र किंवा मैत्रीण ह्यांच्या सहाय्यानेच आपसात संवाद साधायला जमते. ह्या तिसऱ्या व्यक्तीचाही विशेष काहीच उपयोग होऊ शकत नाही हे कळेपर्यंत गोष्टी हाताबाहेर गेलेल्या असतात. अखेर Trust based relationship, एकमेकांचा respect आणि controlled expectations  हेच आयुष्यात  महत्वाचे

कसे हे साध्या सोप्या पद्धतीने समजेल अशी मांडलेली कथा ! जरूर वेळ काढून पाहावे असे अप्रतिम नाटक !

**- आशा अग्निहोत्री**